ॐ ॥ श्री ॥ ॐ

# संस्कारबावन्नी

— अर्थात —

## सांस्कृतिक बावन्न श्लोकांचा संग्रह



— संग्राहक —

श्री. शांताराम नारायण कुळकर्णी

शांती आश्रम, पारोळा. [जि. जळगांव]

किंमत सव्वा रुपया

★ प्रथम संस्करण-१००० 
ता. १५-८-८०

★ व्दितिय संस्करण-१००० 
ता. २६-३-८२

★ तृतीय संस्करण-१००० 
ता. १-१०-८५

★ चतुर्थ संस्करण-१००० 
ता ६-४-८९

★ संग्राहक-
**श्री. शांताराम नारायण कुळकर्णी**
शांती आश्रम, पारोळा [जि. जळगांव]

★ प्रकाशक-
**श्री. डॉ. मनोहर रघुनाथ मोहरीर**
M.B.B.S. (Bom.)
'यशोधन हॉस्पिटल' पारोळा.

★ मुद्रक-
**शिवकृपा प्रिंटर्स**
चितळसर मानपाडा, ठाणे-६०७.

● सर्व हक्क संग्राहकाचे स्वाधीन.

ॐ ॥ श्री ॥ ॐ

# जीवेत् शरदः शतम्



– संग्राहक –

संस्कार बावन्नी आणि सुभाषित पंचदशी

**श्री. शांताराम नारायण कुळकर्णी**
शांती आश्रम, पारोळा.
( जि. जळगांव ) ४२५.१११

नवध्या आवृत्तीची प्रेरणा शक्ति



कैलासवासी

**सौ. गोदावरीबाई** शांताराम **कुळकर्णी**

शांती आश्रम, पारोळा.

जन्म दिनांक २४-११-१९१५

मृत्यु दिनांक २९-११-१९८६

# संग्राहकाचे मनोगत

भारतीय संस्कृति जगात सर्व श्रेष्ठ संस्कृति मानली जाते. या संस्कृतिचा प्रभाव पाश्चात्यांवर होऊन अनेक परकीय विद्वान भारतात येऊन आपल्या भारतीय संस्कृतीचा अभ्यास करु लागलेले आहेत. परंतु पाश्चात्यांच्या आदिभौतिक वर वर दिखाऊ सुधारणांची छाप आजच्या नवीन पिढीवर पडून आपली ही संस्कृति व परंपरा नष्ट होईल की काय अशी भीती उत्पन्न झालेली आहे.

अशा परिस्थितीत भावी पिढीचे आधार स्तंभ जी लहान सहान बालके त्यांच्या कोमल तरुतुल्य बुध्दीवर बालपणीच जर आपल्या भारतीय उज्वल संस्कृति व परंपरेचा ठसा उमटवून दृढ केला गेला तर भावी पिढी उज्वल निपजेल आणि भारतीय संस्कृती व परंपरा टिकून राहील या हेतूने हा अल्पसा प्रयत्न केला आहे तो हेतू सफल होवो ही प्रभूचरणी प्रार्थना !

ता. २०।१०।७९ शांताराम नारायण कुळकर्णी

कार्तिक शु॥ ११ शांती आश्रम पारोळा

# चवथ्या आवृती बाबत दोन शब्द

चितळसर - मानपाडा ठाणे येथे मुक्कामी असताना तेथे हिंदू संस्कृति अभिमानी,

१) श्री. सोपान पोखरकर
२) ,, मोहन पानसरे
३) ,, मुकुंद कुळकर्णी
४) ,, ज्ञानेश्वर महामुनी
५) ,, सुधाकर विठ्ठलशेठ येवले

या सर्वांनाहे पुस्तक आवडले आणि या पुस्तकाची चवथी आवृती चि. मानपाडा येथेच छापली जावी असा आग्रह धरुन विशेषतः श्री. सोपान पोखरकर यांनी अथक प्रयत्न केल्यामुळे ही चवथीं आवृती निघाली या बद्दल आनंद वाटतो.

संग्राहक
शां. ना. कुळकर्णी ता. ६-४-८९ (गुढीपाडवा)

# प्रस्तावना

(राष्ट्रपति पुरस्कार विजेते, श्री. प्र. द. पुराणिक, प्राचार्य हिंदी विद्यालय, पुणे यांची प्रस्तावना.)

श्री. शांताराम नारायण कुळकर्णी, शांती आश्रम पारोळे, यांनी बावन्न श्लोक संस्कारासाठी निवडले आहेत.

सर्व शक्तींमध्ये मानसिक शक्ती अत्यंत बलशाही असते. म्हणून मनाची घडण करणे जीवनात महत्वाचे कार्य ठरते. मनाला बालपणातच योग्य वळण लावता येते. प्रल्हाद, ध्रुव, अरुणी आणि अभिमन्यू यांच्या मनावर बालवयातच संस्कार झाले म्हणून त्यांनी अशक्य ते शक्य करुन दाखविले.

संस्कारासाठी निवडलेल्या या बावन्न श्लोकातून मनाची विशालता, उदात्तता, साहस आदि गुणांचा विकास करावयाचा प्रयत्न केला आहे. मात्र त्यासाठी या उत्कृष्ठ श्लोकांच्यामध्ये असलेला पण सहजपणे न समजणारा दिव्यानुभव देणारा अर्थ सम जावून सांगण्याची अत्यावश्यकता आहे. तो जर समजावून सांगितला नाही तर संस्काराच्या ज्या.

हेतूने हा सारा खटाटोप केला जात आहे. तो मुळ हेतु नष्ट होईल; व हे विद्यार्थी केवळ परंपरागत पद्धतीचे पोपट होतील.

भारतीय संस्कृतीचा थोर वारसा जपायचा असेल तर आचार व विचार यातील विसंगती नाहीशी केली पाहिजे.

श्री. शांताराम कुळकर्णी, आपल्या वयाची सत्तरी ओलांडल्यावरही एका कपर्दिकाचीही अपेक्षा न करता हे संस्काराचे थोर कार्य करीत आहे. हे निश्चितच स्तुत्य व अभिनंदनीय आहे. जनताजनार्दनाने हे कार्य अविरत पणे चालू ठेवायला हस्ते परहस्ते सहाय्य केले पाहिजे.

श्री. कुळकर्णी यांच्या या कार्यास मी सुयश चिंतीतो

**प्र. द. पुराणिक**
प्राचार्य, हिंदी विद्यालय पुणे

# ऋण निर्देश

"संस्कार बावन्नी" हा निवडक श्लोक रत्नांचा हार गुंफताना, "प्रार्थना प्रीती" मुंबई आणि संस्कृति स्वाधाय' पुणे या दोन आदर्श पुस्तकांचा आधार घेतला आहे. म्हणून श्रीमत् भगवत् गीता पाठशाळा माधवबाग, मुंबई आणि गीता धर्म मंडळ प्रकाशन संस्था, पुणे. यांचा मी नम्रतापुर्वक ऋणी आहे.

श्री. प्र. द. पुराणिक प्राचार्य हिंदी विद्यालय पुणे यांनी माझ्या विनंतीला मान देऊन व आपला बहुमोल वेळ खर्च करुन सदर पुस्तक वाचून पुस्तकास प्रस्तावना लिहून पाठविली या बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

पारोळे शहरातील श्री. शं. ग. जोशी (काव्यतीर्थ) यांनी पुस्तकातील स्तोत्रे तपासून शुद्ध करुन दिली व छापताना उपमुद्रिते तपासून बहुमोल साहाय्य केले, तसेच अनेक विद्वान मित्रांनी वेळोवेळी सहाय्य करुन पुस्तकाचे प्रकाशन कामी प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्या सर्वांचा ऋणी आहे.

पारोळा शहरातील अनेक सद्गृहस्थांनी आपापल्यापरी देणगी देऊन सहाय्य केले नसते तर या पुस्तकाचे प्रकाशनही झाले नसते. म्हणून त्या सर्वांचाही ऋण निर्देश करणे आवश्यक आहे.

पारोळे येथील पांडुरंग मंदिराचे चालक श्री. रमेश अनंत पिले M. A. शिक्षा शास्त्री हे पारोळा, मुकटी, दळवेल व भोलणे तांडा या ठिकाणी संस्कार पाठशाला चालवीतात त्यांनी सदर पुस्तकास पाठ्यपुस्तक म्हणून मान्यता दिलेली आहे आणि सदर पुस्तकाचा प्रचार व प्रसार केला आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

शांती आश्रम,
पारोळा.
१५-८-८०

सर्वांचा नम्र
श्री. शां. ना. कुळकर्णी

॥ ॐ ॥

卐 ॥ श्री ॥ 卐

# १ नमन

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः श्री गुरवे नमः। श्री मातृपितृ चरणेभ्यो नमः। श्री कृष्ण परमात्मने नमः। शुभं भवतु.

# २ वेदांच्या आज्ञा

सत्यं वद। धर्मं चर। मातृ देवो भव। पितृ देवो भव। आचार्यं देवो भव। अतिथि देवो भव। स्वाध्यायान् मा प्रमदः। श्रद्धाया देयम।

३ खोटे कधी बोलू नये
चोरी कधी करु नये।
शिवी कोणा देऊ नये,

कोणासंगे भांडू नये ।
पाहिले ते मागू नये,
गोड फार खाऊ नये ।
चित्ती धरीं जो हे बोल,
त्याचे कल्याण होईल ॥

# ४ श्री गणेश स्तवन

वक्रतुंड महाकाय सुर्यकोटी समप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥

# ५ श्री सरस्वती स्तवन

या कुंदेंदुतुषार हार धवला
या शुभ्र वस्त्रावृता ।
या वीणावर दंड मंडित करा
या श्वेत पद्मासना ।
या ब्रम्हाच्युत शंकर प्रभृतिभिर्
देवै सदा वंदिता ।



सा मां पातु सरस्वती भगवती
निःशेष जाड्यापहा ॥

# ६ श्री गुरु स्तवन

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरुःसाक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः

# ७ मातेस वंदन

जिने वाहिले हे नऊमास ओझे
जिने चिंतिले नित्यकल्याण माझे
जिला मोद हो देखुनी बाललीला
नमस्कार त्या जन्मदा माउलीला ॥

# ८ पित्यास वंदन

सुचिता जया नित्य मत् शिक्षणाची
जया लालसा मत् सुखा वैभवाची
जयांचे प्रसादे मिळे ज्ञान ठेवा
नमस्कार त्या सद्गुरुतात देवा ॥

## ९ श्रीकृष्ण नमन

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्माने ।
प्रणत क्लेश नाशाय गोविंदाय नमोनम

प्रातःकाळी सुर्यदयापुर्वी उठावे आणि उठल्या
बरोबर पुढील तीन स्तोत्रे म्हणावीत.

## १० कर दर्शन

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती
कर मूले तु गोविंदः प्रभाते करदर्शनम्

## ११ भूमी वंदन

समुद्र वसने देवी
पर्वत स्तन मंडले ।
विष्णुपत्निनमस्तु भ्यं
पाद स्पर्शं क्षमस्व मे ॥



## १२ नवग्रह स्तवन

ब्रम्हा मुरारी स्त्रिपुरांतकारी
भानुः शशी भूमिसुतो बुधश्च ।
गुरुश्च शुक्रः शनि राहुकेतवः
कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातम् ॥

नंतर प्रातर्विधी उरकावे, स्नान करावे,
स्नान करताना पुढील दोन स्तोत्रे म्हणावीत.

१३ गंगेच यमु नेचैव
गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेरि
जलेऽस्मि संन्निधिं कुरु ॥

१४ गंगा गंगेति यो ब्रूयात्
योजनानां शतैरपि
मुच्यते सर्व पापेभ्यो
विष्णु लोकं स गच्छति ॥

नंतर स्वच्छ वस्त्राने अंग रगडून पुसावे, सर्व अंग कोरडे करावे व धुतलेले कपडे घालताना देवाचे स्तुतिपर पुढील तीन श्लोक म्हणावे-

१५ डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो,
कानीं पदीं चालतो ॥
जिव्हेने रस चाखितो, मधुरही,
वाचे आम्ही बोलतो ।
हातांनी बहुसाळ काम करितो,
विश्रांति ही घ्यावया।
घेतो झोप सुखें फिरुनि उठतो,
ही ईश्वराची दया ॥

१६ देवा परम समर्था,
दीन दयाळा प्रभो जगन्नाथा ।
आलो शरण तुला मी;
दीन तुझ्या ठेवितो पदीं माथा ॥



१७ तूं सागर करुणेचा
देवा तुजलाचि दुःख सांगावे ।
तुज वाचुनि इतरांते,
दिन मुख पसरोनि काय मागावे ॥

नंतर देवासमोर बसून मनोभावाने देवाची पूजा करावी आणि श्री गणपती संकट नाशन स्तोत्र म्हणावे. ते पुढील प्रमाणे-

१८ श्री गणेशाय नमः । नारद उवाच-



प्रणम्य शिरसा देवं
गौरीपुत्रं विनायकम्
भक्तावासं स्मरेन्नित्यं
आयुः कामार्थ सिद्धये ॥१॥

१९ प्रथमं वक्रतुंडंच
एक दंत द्वितीयकम्
तृतीयं कृष्ण पिंगाक्षं
गज वक्त्रं चतुर्थकम् ॥२॥

२० लंबोदरं पंचमंच
षष्ठं विकटमेवच
सप्तमं विघ्नं राजेंद्रं
धूम्र वर्णं तथाष्टकम् ॥३॥

२१ नवमं भालचंद्रंच
दशमं तु विनायकम्
एकादशं गणपतिं
द्वादशं तु गजाननम् ॥४॥

२२ द्वादशैतानि नामानि
त्रि संध्यं यः पठेन्नरः
नच विघ्नभयं तस्य
सर्व सिद्धिकरं प्रभो ॥५॥

२३ विद्यार्थी लभते विद्यां
धनार्थी लभते धनम्
पुत्रार्थी लभते पुत्रान्
मोक्षार्थी लभते गतिम् ॥६



२४ जपेत् गणपतिस्तोत्रं
षड्भिर्मासैः फलं लभेत्
संवत्सरेण सिद्धिं च
लभते नात्र संशयः ॥७॥

२५ अष्टेभ्यो ब्राम्हणेभ्यश्च
लिखित्वा यः समर्पयेत्
तस्य विद्या भवेत् सर्वा
गणेशस्य प्रसादतः ॥८॥

इति श्री नारद पुराणे संकटनाशनं नाम
श्री गणपति स्तोत्रं संपुर्णम् ।

नंतर देवासमोर पुढील तीन श्लोक म्हणून
क्षमा मागावी व प्रार्थना करावी.

२६ आवाहनं न जानामि
न जानामि तवार्चनम्
पूजां चैव न जानामि
क्षम्यतां परमेश्वर ॥१॥

२७ मंत्रहीनं क्रियाहीनं
भक्तिहीनं सुरेश्वर
यत्पूजितं मयादेव
परिपूर्णं तदस्तुमे ॥२॥

२८ अन्यथा शरणं नास्ति
त्वमेव शरणं मम
तस्मात् कारुण्य भावेन
रक्ष रक्ष परमेश्वर ॥३॥

नंतर आपल्या दिवसभराचे उद्योगास लागावे.

जेवणास बसतांना पुढील दोन श्लोक म्हणावे.

२९ अहं वैश्वानरो भूत्वा
प्राणिनां देहमाश्रितः
प्राणापान समायुक्तः
पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥



३० वदनि कवळ घेतां
नाम घ्या श्री हरीचें
सहज हवन होते
नाम घेता फुकाचें
जिवन करि जिवित्वा
अन्न हें पुर्ण ब्रम्ह
उदर भरण नोहे
जाणिजे यज्ञ कर्म ॥

जय जय रघुवीर समर्थ

सायंकाळी दिवे लावणांचे वेळी दिव्यास नमस्कार—

३१ शुभंकरोति कल्याणम्
आरोग्यं धनसंपदा
शत्रु बुद्धी विनाशाय
दीपो ज्योति नमोस्तुते ॥

समर्थश्रीरामदासस्वामी महाराज की जय

# ॥ श्री ॥

यापुढे निरनिराळी स्तोत्रे दिली आहेत. ती ती त्या त्या देवाचे दर्शन घेताना उपयुक्त आहेत.

# संकीर्ण स्तोत्रे

## ३१ भगवंतास नमस्कार

(चामर वृत्त)

गुणाकरं सुखाकरं कृपाकरं कृपापरं
सुरद्विषन्निकदनं नमामि गोपनंदनम्।
नवीन गोप नागरं नवीन केलिलंपटं
नमामि मेघ सुंदरं तडित प्रभा
लसत् पटम् ॥

## ३२ श्री गणपतीला नमस्कार

विघ्नेश्वराय वरदाय सुरप्रियाय
लंबोदराय सकलाय जगद्धिताय।
नागाननाय श्रुतियज्ञ विभूषिताय
गौरीसुताय गणनाथ नमो नमस्ते ॥



## ३४ सद्गुरुंना नमन

ब्रम्हानंदं परमसुखदं
केवलं ज्ञान मुर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं
तत्वमस्यादि लक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं
सर्वधी साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुण रहितं
सद्गुरुं तन्नमामि ॥

## ३५ सर्व देवांना नमस्कार

आकाशात् पतितं तोयं
यथा गच्छति सागरम् ।
सर्व देव नमस्कारः
केशवं प्रतिगच्छति ॥

## ३६ विठोबाला नमस्कार

समचरण सरोजं सांद्रनीलांबुदाभम्
जघननिहित पाणिं मण्डनं मण्डनानाम्
तरुणतुलसीमाला कंधरं कंजनेत्रम्
सदय धवल हासं विठ्ठलं चिंतयामि ॥

## ३७ श्री विष्णूला नमस्कार

शांताकारं भुजग शयनं
पद्मनाभं सुरेशम् ।
विश्वाधारं गगन सदृशं
मेघवर्णम शुभांगम् ।
लक्ष्मीकांतं कमल नयनं
योगिभिर ज्ञानगम्यम् ।
वंदे विष्णुं भव भय हारं
सर्व लोकैक नाथम् ।



## ३८ देवीला वंदन

नमो देव्यै महादेव्यै
शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै
नियताः प्रणताः स्मताम् ॥

## ३९ शंभू देवास वंदन

कचरण कृतं वाक्
कायजं कर्मजं वा ।
श्रवण नयनजं वा
मानसं वापराधम् ।
विहितमविहितं वा
सर्वं मेतद् क्षमस्व ।
जय जय करुणाब्धे
श्री महादेवशंभो

## ४० श्री रामचंद्राला नमस्कार



रामो राजमणिः सदा विजयते
रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू
रामाय तस्मै नमः ।
रामान्नास्ति परायणं परतरं
रामस्य दासोऽस्म्हम् ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे
भो राम मामुद्धर ।

## ४१ मारुतीस नमस्कार



मनोजवं मारुत तुल्य वेगम्
जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्
वातात्मजं वानरयूथ मुख्यम्
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ।।



## ४२ एक श्लोकी रामायण

आदौ राम तपोवनादि गमनं
हत्वा मृगं कांचनम् ।
वैदेहि हरणं जटायु मरणं
सुग्रीव संभाषणम्
बाली निर्दलनं समुद्रतरणं
लंकापुरी दाहनम् ।
पश्चात् रावण कुंभकर्णहननं
एतद्धि रामायणम् ।।

## ४३ एक श्लोकी भागवत

आदौ देवकिर्देवि गर्भजननं
गोपी गृहे वर्धनम् ॥
माया पूतन जीविताप हरणं
गोवर्धनोद्धारणम्

कंसच्छेदन कौरवादि हननं
कुंती तनूजावनम् ।
एतद् भागवतं पुराण कथितं
श्रीकृष्ण लीलामृ तम ।।

## बारा ज्योतीर्लिंगे

४४ सौराष्ट्रे सोमनाथं च



श्री शैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालं
ओंकार ममलेश्वरम् ।
४५ परल्यां वैजनाथं च
डाकिन्यां भीमे शंकरभू ।
सेतुबंधेतु रामेशं
नागेशं दारुकावने ।।
४६ वारणस्यां तु विश्वेशं
त्र्यंबकं गौतमी तटे ।
हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये



४७ एतानि ज्योतिर्लिगानि
सायं प्रातः पठेन्नरः ।
सप्त-जन्म-कृतं पापं स्मरणेन विनश्यति

## ४८ देवाजवळ मागणे

सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानी पडो
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो
सदंघ्रि कमळी दडो मुरडिता हटाने अडो
वियोग घडतां रडो मन भवच्चरित्री जडो

४९ न निश्चय कधी ढळो
कुजन विघ्न बाधा टळो ।
न चित्त भजनी चळो
मति सदुक्त मार्गी वळो ।।
स्वतत्त्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो
पुन्हा न मन हे मळो दुरित आत्मबोधे जळो

# शेवटी

५० सर्वेऽपि सुखिनः संतु
सर्वे संतु निरामयः ।
सर्वे भद्राणि पश्यंतु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥
५१ ॐ असतो मा सद् गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय ॥
५२ ॐ सहना–ववतु
सहनौ भुनक्तु
सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विना - वधीत मस्तु
माविद्विषावहै ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

# वर प्रदान



या बावन्न स्तोत्रांचे जो मनःपूर्वक अध्ययन करील आणि त्यातील अर्थ समजावून घेऊन दररोज नित्य-नियमाने विचार, उच्चार व आचारपूर्वक पठण करील त्याला मनःशांती लाभेल आणि त्याची आत्मोन्नती झाल्याशिवाय राहणार नाही असा शुभ आशिर्वाद या पुस्तकास प्राप्त झालेला आहे. !

इति अलम् ।

श्री गोपालकृष्णार्पणमस्तु ॥